(12) मुलांचे व मुलींचे वसतिगृह नुतनीकरण

**महाराष्ट्र शासन**

क्र.वसति-५३१४/प्र.क्र.३२/१४/मशि-२
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगूरू चौक,
मंत्रालय, मुंबई. ४०० ०३२.
दिनांक : २८ मार्च, २०१४.

प्रति,
संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

सह संचालक, उच्च शिक्षण,
नागपूर विभाग, नागपूर.

**विषय:- वसंतराव नाईक जन्मशताब्दी वर्ष योजना-**
**वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर येथील मुलांच्या व मुलींच्या जुन्या वसतिगृहाचे नुतनीकरण व सौंदर्यीकरण करणेबाबत.**

संदर्भ:- (१) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक-शताब्दी-२०१३/प्र.क्र.३१८/२९-अ, दिनांक २५ नोव्हेंबर, २०१३.
(२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय, समक्रमांक, दिनांक ५ फेब्रुवारी, २०१४.
(३) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक-शताब्दी-२०१४/प्र.क्र.१०६/१४/२९-अ, दिनांक २८ फेब्रुवारी, २०१४ व दिनांक २८ मार्च, २०१४.

उपरोक्त विषयावरील संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये स्व. वसंतराव नाईक जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर येथील मुलांच्या व मुलींच्या जुन्या वसतिगृहांचे नुतनीकरण व सौंदर्यीकरण करण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे. तसेच संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये सदर कामासाठी रु.२.०० कोटी एवढया रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

संदर्भ क्र.३ येथील दिनांक २८ फेब्रुवारी, २०१४ च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभागाने सदर कामासाठी अंदाजपत्रकीय किंमतीच्या ८०% च्या मर्यादेत रु.१.६० कोटी एवढी रक्कम सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाकरिता उच्च व तंत्र शिक्षण विभागास वितरित केली होती. आता सामान्य प्रशासन विभागाने त्यांच्या संदर्भ क्र.३ येथे नमूद दिनांक २५ मार्च, २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर कामासाठीच्या अंदापत्रकीय किंमतीपैकी उर्वरित २०% म्हणजेच रु.४०.०० लक्ष एवढी रक्कम उच्च व तंत्र शिक्षण विभागास मंजूर व वितरित करण्यास मान्यता दिलेली आहे. तसेच उपलब्ध केलेली तरतूद आहरीत करण्यासाठी विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर यांना आहरण व संवितरण अधिकारी व संचालक, उच्च शिक्षण यांना नियंत्रण अधिकारी घोषित केलेले आहे. याबाबतच्या शासन निर्णयाची प्रत व निधी वितरणाबाबतची बीडीएस ची प्रत सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. तरी या अनुषंगाने पुढील आवश्यक ती कार्यवाही तातडीने करावी व त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा, ही विनंती.

(उर्मिला जोशी)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,
संचालक, वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर यांना माहितीसाठी अग्रेषित.

**स्व. वसंतराव नाईक जन्मशताब्दी वर्ष योजना**

वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर येथे मुलींचे नविन वसतीगृह बांधण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

शासन निर्णय क्र. शताब्दी-२०१४/प्र.क्र. ६८/१४./२९अ

मंत्रालय, मुंबई-३२.

दिनांक : २८ मार्च, २०१४.

**वाचा:-** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. शताब्दी-२०१३/प्र.क्र.३१८/२९अ, दिनांक २५.११.२०१३.

२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.वसति-५३१३/प्र.क्र.२०४/१४/मशि-२, दि.५.२.२०१४.

३) उच्च व तंत्र शिक्षण विभागाची टिप्पणी दि. ७.२.२०१४.

४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. शताब्दी-२०१४/प्र.क्र. ६८/१४ /२९अ, दि.२८.२.२०१३.

**प्रस्तावना** :- स्व. वसंतराव नाईक जन्मशताब्दी वर्षात आयोजीत करावयाचे कार्यक्रम निश्चित करण्यासाठी मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली समितीने निश्चित केलेल्या विविध योजना व कामांना संदर्भ क्र.१ अन्वये मंजूरी देण्यात आली असून त्यापैकी "नागपूर येथे विद्यार्थिनीकरिता वसतीगृह निर्माण करणे" यासाठी रु.८.०० कोटी निधी वर्गीकृत करण्यात आला आहे. त्यानुसार वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर येथे २०० प्रवेश क्षमतेसह मुलींचे नविन वसतीगृह बांधण्यासाठी रु.७.९० कोटीच्या खर्चास संदर्भ क्र.२ अन्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसेच संदर्भ क्र.४ अन्वये रु.७.९० कोटी उपलब्ध करुन देण्याची विनंती उच्च व तंत्र शिक्षण विभागाने केली आहे. त्यानुसार संदर्भ क्र.४ अन्वये एकूण तरतुदीच्या ८०% च्या मर्यादेत रु.६.३२ कोटी सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाकरिता उच्च व तंत्र शिक्षण विभागाला वितरीत करण्यात आले आहेत. तसेच उर्वरित २०% निधी म्हणजे रु.१.५८ कोटी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती -

**शासन निर्णय** :-

स्व. वसंतराव नाईक जन्मशताब्दी योजनेअंतर्गत वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर येथे २०० प्रवेश क्षमतेसह मुलींचे नविन वसतीगृह बांधण्यासाठी रु.१.५८ कोटी (रुपये एक कोटी अठ्ठावन्न लक्ष फक्त) सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाकरिता उच्च व तंत्र शिक्षण विभागाला मंजूर व वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सहरहू बाबीकरिता मंजूर केलेली तरतूद आहरित करण्यासाठी विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण, नागपूर, नागपूर विभाग, नागपूर (क्र.४६०१००२२०५), यांना 'आहरण व संवितरण अधिकारी' व संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना 'नियंत्रण अधिकारी' म्हणून घोषित करण्यात येत आहे. आहरण व संवितरण अधिकारी यांनी सदर निधीच्या विनियोगाबाबत तसेच महालेखापाल यांच्या लेख्याशी खर्च ताळमेळ घालण्याची कार्यवाही करावी. तसेच विहित नमून्यातील खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित वेळेत या विभागाला सादर करण्याची जबाबदारी उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांची राहील.

३. प्रस्तुत प्रकरणी विहित मर्यादेत खर्च होईल व होणारा प्रत्येक खर्च हा विहित कार्यपध्दती अनुसरुन व प्रचलित नियमानुसारच केला जाईल याची दक्षता संबंधीतांनी घ्यावी.

४. सदर बाबीवरील खर्च सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाकरिता "मागणी क्रमांक:-ए- ४- मुख्य लेखाशीर्ष २०७५- संकीर्ण-सर्वसाधारण सेवा ८००- इतर खर्च, (००) (१५) स्वर्गीय वसंतराव नाईक जन्मशताब्दी वर्ष महोत्सव (२०७५०६९७), ५० इतर खर्च (योजनातंर्गत)" या लेखाशिर्षाखाली मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय नियोजन विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र. १०७/कार्या.१४४३, दि. २६/०३/२०१४ व वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र. ४००/१४/व्यय-४, दि. २८/०३/२०१४ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

(र. ग. पांचाळ)
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
मा. मुख्यमंत्री याचें अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण), यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई-३२
मा.राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण), यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई-३२
मा.राज्यमंत्री (साप्रवि), यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई-३२
अ.मु.स. (प्र.सु. व र.व का.), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
महालेखापाल (लेखापरिक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई,
महालेखापाल (लेखापरिक्षा) महाराष्ट्र-२, नागपुर,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर,
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
जिल्हाधिकारी, नागपूर,
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर
विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण, नागपूर, नागपूर विभाग, नागपूर
जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर,
उप सचिव (कार्या.१४४३), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
उप सचिव (व्यय-४ / अर्थसंकल्प-१४), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
उप सचिव (इमारती-१), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
उप सचिव (कार्या. माशि-२), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
उपसचिव (कार्या- २५, २९अ) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
निवडनस्ती (कार्या.२९अ)

**स्व. वसंतराव नाईक जन्मशताब्दी वर्ष योजना**
वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर येथील मुलांच्या व मुलींच्या जुन्या वसतीगृहाच्या नुतनीकरण व सौंदर्यीकरणासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबांबत.

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
शासन निर्णय क्र. शताब्दी-२०१४/प्र.क्र. १०६/१४ /२९अ
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक : २८ मार्च, २०१४.

**वाचा:-** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. शताब्दी-२०१३/प्र.क्र.३१८/२९अ, दिनांक २५.११.२०१३.
२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.वसति-५३१४/प्र.क्र.३२/१४/मशि-२, दि.२४.२.२०१४.
३) उच्च व तंत्र शिक्षण विभागाची टिप्पणी दि. २१.२.२०१४.
४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. शताब्दी-२०१४/प्र.क्र.१०६/१४/२९अ, दि.२८.२.२०१४.

**प्रस्तावाना :-** स्व. वसंतराव नाईक जन्मशताब्दी वर्षात आयोजीत करावयाचे कार्यक्रम निश्चित करण्यासाठी मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील समितीने निश्चित केलेल्या विविध योजना व कामांना संदर्भ क्र.१ अन्वये मंजूरी देण्यात आली असून त्यापैकी "नागपूर येथील मॉरिस कॉलेजच्या मुलींच्या वसतीगृहाचे नूतनीकरण व सौंदर्यीकरण करणे " यासाठी रु.२.०० कोटी निधी वर्गीकृत करण्यात आला आहे. त्यानुसार वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर येथील मुलांच्या व मुलींच्या जुन्या वसतीगृहाचे नुतनीकरण व सौंदर्यीकरणासाठी रु.२.०० कोटीच्या खर्चास संदर्भ क्र.२ अन्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. संदर्भ क्र.३ अन्वये रु.२.०० कोटी उपलब्ध करुन देण्याची विनंती उच्च व तंत्र शिक्षण विभागाने केली आहे. त्यानुसार संदर्भ क्र.४ अन्वये एकूण तरतुदीच्या ८०% च्या मर्यादेत रु.१.६० कोटी सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाकरिता उच्च व तंत्र शिक्षण विभागाला वितरीत करण्यात आले होते. तसेच उर्वरित २०% निधी म्हणजे रु.४०.०० लक्ष वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती -

**शासन निर्णय :-**

स्व. वसंतराव नाईक जन्मशताब्दी योजनेअंतर्गत वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर येथील मुलांच्या व मुलींच्या जुन्या वसतीगृहाचे नुतनीकरण व सौंदर्यीकरणासाठी रु.४०.०० लक्ष (रुपये चाळीस लक्ष फक्त) सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाकरिता उच्च व तंत्र शिक्षण विभागाला मंजूर व वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सहरहू बाबीकरिता मंजूर केलेली तरतूद आहरित करण्यासाठी विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण, नागपूर, नागपूर विभाग, नागपूर (क्र.४६०१००२२०५), यांना 'आहरण व संवितरण अधिकारी' व संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना 'नियंत्रण अधिकारी' म्हणून घोषित करण्यात येत आहे. आहरण व संवितरण अधिकारी यांनी सदर निधीच्या विनियोगाबाबत तसेच महालेखापाल यांच्या लेख्याशी खर्च ताळमेळ घालण्याची कार्यवाही करावी. तसेच विहित नमून्यातील खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित वेळेत या विभागाला सादर करण्याची जबाबदारी उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांची राहील.

३. प्रस्तुत प्रकरणी विहित मर्यादेत खर्च होईल व होणारा प्रत्येक खर्च हा विहित कार्यपध्दती अनुसरुन व प्रचलित नियमानुसारच केला जाईल याची दक्षता संबंधीतांनी घ्यावी.

४. सदर बाबीवरील खर्च सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाकरिता "मागणी क्रमांक:-ए- ४- मुख्य लेखाशीर्ष २०७५- संकीर्ण-सर्वसाधारण सेवा ८००- इतर खर्च, (००) (९५) स्वर्गीय वसंतराव नाईक जन्मशताब्दी वर्ष महोत्सव (२०७५०६९७), ५० इतर खर्च (योजनातंर्गत)" या लेखाशिर्षाखाली मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.